

# ईआयबी ग्रुप तक्रार यंत्रणा
## सार्वजनिक जबाबदारीचे साधन

# स्टेप 1: तक्रार

## तक्रार कोण करू शकतो ?

ईआयबी च्या कुठल्याही प्रकल्पामुळे त्रस्त झालेली व्यक्ती तक्रार दाखल करू शकते.

## मी कशा बद्दल तक्रार करू शकतो ?

ईआयबी ने घेतलेले निर्णय किंवा उपक्रम अयोग्य पद्धतीने घेतले गेलेले आहेत किंवा घेतले जात आहेत असे वाटत असल्यास  तुम्ही तक्रार करू शकता.

कुठल्याही प्रकल्पा विषयी हवी असलेली माहिती उपलब्ध होत नसल्यास, प्रकल्पाचे पर्यावरणावर होणारे परिणाम व  सामाजिक परिणाम, किंवा भरती प्रक्रिया ह्याबद्दल आपण तक्रार करू शकता. प्रकल्पासंबंधी नियोजन,अंमलबजावणी किंवा परिणाम ह्यांचा समावेश आपल्या तक्रारी मधे असू शकतो.

समस्ये बाबत माहिती झाल्यापासून एका वर्षा च्या आत आपण तक्रार करू शकता.

## माझी माहिती गोपनीय राहील का?

ईआयबी - तक्रार निवारण, (ईआयबी – सीएम), अज्ञात व्यक्तीकडून तक्रार स्वीकारत नाही. परंतू तुमची वैयक्तिक माहिती आपल्या लेखी परवानगी शिवाय कुणालाही दिली जाणार नाही.

जो पर्यंत आपण गोनियतेची विनंती करत नाही तोपर्यंत आपल्या तक्रारीचे मुद्दे हे (जसेकी आपले आरोप) सार्वजनिक समजले जातील.

आपली तक्रार, बदला, गैरवर्तन, किंवा कुठल्याही प्रकारच्या भेदभावामध्ये  रूपांतरित व्हायला नको.

ई आय बी मधे कुठल्याही प्रकाचारच्या सूड भावनेला सहन न करण्याचे धोरण आहे (शून्य  सहिष्णुता धोरण).

## मी कशा प्रकारे तक्रार नोंदवू शकतो ?

लेखी तक्रार ऑनलाईन फॉर्मच्या माध्यमातून, किंवा इमेल, फॅक्सद्वारे, किंवा पोस्टद्वारे ई आय बी च्या पत्यावर पाठवू शकता.( संपर्क माहिती बघा) किंवा ई आय बी च्या बाहेरील कार्यालयाला पाठवू शकता.

तुम्ही आपल्या तक्रारी कोणत्याही यूरोपीयन युनियन भाषांमध्ये करू शकता.

ईआयबी - तक्रार निवारण यंत्रणा ज्या देशात प्रकल्प चालू आहे  तिथल्या अधिकृत भाषांमध्ये तक्रार घेण्यास प्रयत्नशील आहे.

खालील संकेत स्थळावर ऑनलाईन  तक्रार अर्ज उपलब्ध आहे.

**www.eib.org/complaints/form**

# स्टेप 2: रजिस्ट्रेशन

### माझी तक्रार दाखल होईल की नाही हे मला कसे कळणार?

ईआयबी तक्रार निवारण यंत्रणा आपल्याला दहा दिवसात आपली तक्रार मिळाल्याची पोच पावती देईल.

जर आपली तक्रार दाखल करण्या जोगी नसेल तर ई आय बी तर्फे आपल्याला त्याचे कारण कळवण्यात येईल.

जर आपली तक्रार दाखल होण्यास पात्र असेल तर ईआयबी- तक्रार निवारण यंत्रणा आपल्याला त्याबद्दल अधिक माहिती देईल आणि आपल्याला उत्तर कसे किंवा कधी मिळेल हे कळवण्यात येईल.

# स्टेप 3: तक्रार हाताळण्याची प्रक्रिया

### ह्या स्टेजला माझ्या कडून काय अपेक्षा आहे ?

तक्रार हाताळण्याची प्रक्रिया ही तक्रारीचा प्रकार, नोंदवण्यासाठी वापरलेली पद्धत, प्राथमिक पडताळणी, आरोप किंवा तथ्य ह्यावर अवलंबून आहे.

ईआयबी आपल्याला अधिक माहितीसाठी संपर्क करू शकते. आणि तक्रारीची सत्यासत्यता तपासण्यासाठी कृती करू शकते.

मिडिएशन -Mediation ( मध्यस्थीच्या साहाय्याने दोन्ही पक्षांचे समाधान करणे)

जर सर्व पक्षांची सहमती असेल तर ई आय बी तक्रार निवारण यंत्रणा मध्यस्थ नेमून समाधान करू शकते. ह्यामध्ये देश पातळी वरील सरकारी अधिकारी किंवा ईआयबी ग्रुप सर्व्हिसेसचा समावेश असू शकतो.

आपण  मध्यस्थ नेमण्याची विनंती करू शकता.





# स्टेप 4: निष्पत्ती

## ह्या प्रक्रियेचे संभाव्य परिणाम/ निष्पत्ती काय आहेत?

- समस्येचे समाधान
- ईआयबी समूह व्यवस्थापनाला शिफारस केली जाईल
- सुधारक कृती सुचविली जाईल.
- पुढील कार्यवाही थांबेल.
- आरोप खारीज केले जातील.

## मला परिणाम कसा कळेल?


ईआयबी तक्रार निवारण यंत्रणा आपल्याला तक्रारीच्या परिणाम/ निष्पत्ती बद्दल अधिकृत माहिती देईल.

तक्रारीला उत्तर देण्याचा कालावधी हा तक्रार हाताळण्याच्या प्रक्रियेवर अवलंबून आहे आणि तक्रार स्वीकारल्याचे उत्तर दिल्यापासून त्याला २५ ते २४० कार्यालयीन दिवस लागू शकतात. अधिक माहितीसाठी खालील फ्लो चार्ट बघा.

## पुढे काय ?

जर समस्या सोडवण्याची कृती व शिफारसी उत्तरामध्ये समाविष्ट असतील तर ईआयबी त्या अमलात आणते. केसचा निकाल ईआयबी च्या संकेतस्थळावर प्रकाशित केला जातो (गोपनीयतेविषयी सर्व नियम लक्षात घेऊन )

जर आपल्याला निकाल समाधानकारक वाटत नसेल तर आपण ईआयबी ग्रुप विरुद्ध युरोपियन ओंबड्समनकडे तक्रार नोंदवू शकता.




‘ ई' म्हणजे प्रकल्पांचा पर्यावरणावर आणि समाजावर होणार परिणाम
आणि
‘एफ' म्हणजे वित्त पुरवठा केलेल्या  कार्यक्रमांचे व्यवस्थापन

ईआयबी ग्रुप मध्ये युरोपियन इंव्हेस्टमेंट बँक आणि युरोपियन इंव्हेस्टमेंट फंड यांचा समावेश होतो.

युरोपियन इंव्हेस्टमेंट बँक ही युरोपियन युनियनची कर्ज देणारी शाखा आहे. ईआयबी त्या शाश्वत प्रकल्पांकरिता आर्थिक मदत आणि कौशल्य यांचा पुरवठा करते जे प्रकल्प युरोपियन युनियनच्या धोरणांमध्ये योगदान देतात. युरोपियन युनियनचे सदस्य राष्ट्र हे इआयबीचे भागीदार आहेत.

युरोपियन इंव्हेस्टमेंट फंड लघु व मध्यम उद्योगांना (SMEs) आर्थिक मध्यस्थांच्या विस्तृत श्रेणीद्वारे निधी सहायता मिळवून मदत करते. युरोपियन इंव्हेस्टमेंट फंडची मुख्य भागीदार युरोपियन इंव्हेस्टमेंट बँक आहे, तसेच युरोपियन युनियन आणि इतर सार्वजनिक आणि खाजगी वित्तीय संस्था उर्वरित भागीदार आहेत.

युरोपियन ओंबड्समन (लोकपाल ) ही एक स्वतंत्र संस्था आहे जी ई यु प्रशासनाला जबाबदारी घेण्यास पात्र ठरवते. ओंबड्समन ई आय बी समुहासह युरोपियन युनियन संस्थांमधील गैरकारभाराच्या तक्रारींची चौकशी करते. ज्यांना युरोपियन युनियनच्या प्रशासनामध्ये समस्या आल्या आहेत आणि त्यांनी संस्थेशी संपर्क साधून समस्या सोडवण्याचा अयशस्वी प्रयत्न केला आहे, ते ओंबड्समनकडे तक्रार करू शकतात.

European Investment Bank
The EU bank

EIF

CM
Complaints Mechanism

ईआयबी ग्रुप तक्रार यंत्रणा
98-100 बुलेवर्ड कोनराड अॅडेनॉअर
L-2950 लक्झेंबर्ग
फोन: +352 4379 – 14005
फॅक्स : +352 4379 – 63362
ईमेल: **complaints@eib.org**

अधिक माहिती **www.eib.org/complaints** वर उपलब्ध आहे

04/2022 MR